जनसंपर्क कक्ष
24 JUN 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या समता परिषद

कोल्हापूर, ता. २३ : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त शाहू सेना आणि शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी (ता. २५) समता परिषद होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी अकरा वाजता इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, आमदार सतेज पाटील प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. सर्व शाहूप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक यांनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

पुढारी

# शाहू जयंतीनिमित्त उद्या समता परिषद

कोल्हापूर : आरक्षणाचे जनक, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त शाहू सेना आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २५) समता परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेत इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांचे 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास खासदार शाहू महाराज, आमदार सतेज पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. शाहू सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता ही परिषद होणार आहे. शाहूप्रेमी, विद्यार्थी, शिक्षक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू सेना जिल्हाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी केले आहे.

24 JUN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवी अस्तित्वाचा शोध म्हणजे मराठी प्रेम कविता : प्र. कुलगुरू पी. एस.

**। उचगाव : प्रतिनिधी**

मानवी जीवनात प्रेमाला अग्रस्थान आहे. संपूर्ण मानवी जीवन प्रेमाभोवती फिरत आहे. प्रेम मानवी संस्कृतीचा सारांश आहे आणि प्रेम मानवी जीवनाचा अभ्युदयही आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महावीर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांच्या 'मराठी प्रेम कविता : अस्तित्ववादी दृष्टिकोनातून' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र केसरी पै. विष्णू जोशीलकर, बाळासाहेब बांदिवडेकर, विजयकुमार दळवी, जे. बी. पाटील, भिकाजी दळवी, शशिकांत जाधव, प्राचार्य राजेखान शानेदिवाण, प्राचार्य जी. पी. माळी, प्राचार्य दत्ता पाटील, डॉ. अनिल गवळी, अरुण काकडे, सुप्रिया आवारे, भीमराव चिमणे, प्राचार्य विजय डोणे, अरुण पाटील, अंकुश बनसोडे, दीपककुमार वळवी, सुभाष जाधव, नामदेव मोळे, जे. बी. बाचूळकर, गोमटेश्वर पाटील, प्रकाश दुकळे, माणतेश हिरेमठ, एकनाथ पाटील, जॉर्ज क्रूज आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. विनोद कांबळे यांनी केले. मनोज जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रांजली खबाले-क्षीरसागर यांनी केले.

पाटील म्हणाले, प्रेमाशिवाय आपण जगू शकत नाही, मग ते प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी, आई-बाप आणि मुले, मित्र-मित्र या सर्वांमध्ये प्रेम असते. प्रेमाचे स्वरूप वेगळे असले तरी, प्रेमाचा धागा माणसाला जगण्याची उमेद देतो. मराठी साहित्यात प्रेमावर फारसे लिहिले गेले नाही. असे प्रस्तावनेत डॉ. विनोद कांबळे यांनी सांगितले. शांता शेळके आणि अरुणा ढेरे यांचे मराठी प्रेम कविता, बा. भ. बोरकर यांच्या १०० प्रेम कविता यासारखी काही हाताच्या बोटावर मोजता येतील अशी मराठी प्रेम कवितेवर पुस्तके प्रकाशित आहेत. अध्यक्षस्थानावरून पैलवान विष्णू जोशीलकर म्हणाले, चंदगड तालुक्यामध्ये अनेक रत्ने जन्माला आलेली आहेत. डॉ. गोपाळ गावडे असेच एक रत्न आहे.

24 JUN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानातील उद्देशिका हेच देशाचे ओळखपत्र

## डॉ. आवटे : मूलभूत हक्क वगळल्यास नागरिक म्हणून किंमत शून्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : भारतीय संविधानातील उद्देशिका हेच देशाचे ओळखपत्र असून, त्यातून मूलभूत हक्क वगळल्यास नागरिक म्हणून आपली किंमत शून्य आहे, असे डॉ. श्रीरंजन आवटे यांनी सोमवारी येथे सांगितले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे १५१ व्या राजर्षी शाहू जयंतीनिमित्त आयोजित राजर्षी शाहू व्याख्यानमालेत ते बोलत होते. त्यांनी 'भारतीय संविधान मूलभूत अधिकार व कर्तव्ये' विषयावर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या माजी विभाग प्रमुख डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमध्ये व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे.

### राजर्षी शाहू व्याख्यानमाला



कोल्हापूर : राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे १५१ व्या राजर्षी शाहू जयंतीनिमित्त आयोजित राजर्षी शाहू व्याख्यानमालेत बोलताना डॉ. श्रीरंजन आवटे.

### आजचे व्याख्यान

- वक्ते : डॉ. श्रीराम पवार
- विषय : भारतीय संविधान व संसदीय लोकशाही
- वेळ : सायंकाळी ६ वाजता

डॉ. आवटे म्हणाले, 'भारतीय संविधानातील उद्देशिका विचारपूर्वक लिहिली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वातून भारतीय समाज रचनेचे प्रारुप स्पष्ट होते. त्यात लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता ही विशेषणे देशातील सार्वभौमत्त्वाची ओळख करून देणारी आहेत.

महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर देशाची वाटचाल सुरू आहे. तोच मूळ भारत आहे. नव्या रचनेतील भारतात संविधानात विकृतता घुसडली जात असून, नवा भारत समोर आणला जात आहे. त्याचा धोका वेळीच ओळखणे गरजेचे आहे.''

ते म्हणाले, ''उद्देशिका नेमकी कोणाला अर्पण करायची, यावर बराच वाद-विवाद झाला होता. अखेर ती लोकांनीच लोकांना अर्पण करण्याचा निर्णय झाला. प्रत्येक धर्माला त्यांचा धर्मग्रंथ पवित्र असतो. तसे संविधान प्रत्येकासाठी पवित्र असायला हवे. त्यातील सामाजिक न्याय व समतेचे तत्त्वज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यात अपयश आल्याचे दिसत आहे.' ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते. राजदीप सुर्वे यांनी आभार मानले.

24 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलानगरीत सुरू झाली फिल्मची फॅक्टरी..!

## शिवाजी विद्यापीठात बी. ए. फिल्म मेकिंग कोर्स

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठी चित्रपटसृष्टीने कोल्हापुरात कधीकाळी समृद्ध काळ अनुभवला. मात्र, काळाच्या ओघात ही चित्रनगरी काहीसी मागे पडली असली तरी आता पुन्हा याच चित्रनगरीला गतवैभव प्राप्त करून देण्याची संधी शिवाजी विद्यापीठातील बी.ए. फिल्ममेकिंग या अभ्यासक्रमामुळे उपलब्ध झाली आहे.

प्री- प्रोडक्शन, प्रोडक्शन आणि पोस्ट प्रोडक्शन अशा सर्वच स्तरावरील कुशल मनुष्यबळ घडवण्यासाठी विद्यापीठ सरसावले आहे. विद्यापीठाचा बारावीनंतर तीन वर्षांचा हा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम कोल्हापूरला नवसंजीवनी देणारा ठरणार आहे. विद्यापीठात २०२४ पासून पहिल्यांदाच पदवीस्तरावरचा बी.ए. फिल्ममेकिंग अभ्यासक्रम सुरू केला. तीन वर्षांच्या या अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वर्षी ३० इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे.

**३०**
इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी

एखादी मालिका किंवा चित्रपट कसा बनवायचा, कॅमेरा कसा हाताळायचा, त्याचे शूटिंग, एडिटिंग कसे करायचे याचे ज्ञान या अभ्यासक्रमातून दिले जाते.


शिवाजी विद्यापीठातील बी.ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांना व्हिडीओ कॅमेरा हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

### विद्यार्थ्यांना हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग

फिल्म मेकिंग कोर्सला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना हँड्स ऑन ट्रेनिंग दिले जाते. पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांनी 'मेटाफर' नावाची शॉर्ट फिल्म तयार केली असून ही फिल्म अनेक फिल्म फेस्टिव्हलमध्ये आपला ठसा उमटवत आहे.


### राज्यभरातील विद्यार्थ्यांचा ओढा

चित्रपट किंवा मालिका करायची असेल तर नुसते कलाकार असून चालणार नाही तर तो चित्रपट-मालिका ताकदीने त्या फ्रेममध्ये बसवणेही तांत्रिकदृष्ट्या कौशल्याचे असते. हेच तांत्रिक कौशल्य बी.ए. फिल्ममेकिंग अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना दिले जाते. कोल्हापूरसह राज्यभरातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत आहेत. हाच अभ्यासक्रम खासगी संस्था किंवा इन्स्टिट्यूटमध्ये शिकायचे झाल्यास शैक्षणिक शुल्क लाखाच्या घरात आहे. मात्र, विद्यापीठात नाममात्र शुल्कामध्ये शिकवला जातो.

पुण्यनगरी



प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे



डॉ. उमाकांत पाटील



कुलदीप बेलेकर

# ऊर्जा साठवणुकीच्या 'हायड्रोथर्मल'साठी 'डी. वाय.' अभिमत विद्यापीठाला पेटंट

**कोल्हापूर :** डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च विभागातील संशोधकांनी ऊर्जा साठवण्यासाठी संशोधित केलेल्या हायड्रोथर्मल या रासायनिक पद्धतीसाठी पेटंट जाहीर झाले. विद्यापीठाचे संशोधन संचालक प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे, सहयोगी प्राध्यापक डॉ. उमाकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन झाले. ऊर्जा साठवण्यासाठी उपयुक्त मॅंगनीज फॉस्फेट आधारित पातळ फिती (थीन फिल्म्स) तयार करण्याच्या सोप्या आणि कमी खर्चिक 'हायड्रोथर्मल' या रासायनिक पद्धतीसाठी हे पेटंट जाहीर झाले आहे. पातळ फितीमुळे पदार्थाची स्थिरता, ऊर्जा साठवण क्षमता, सुपरकॅपॅसिटरची लवचिकता वाढवण्यासाठी मदत होते. यामध्ये मुख्य संशोधकांसमवेत संशोधक विद्यार्थी कुलदीप बेलेकर, रणजित निकम आणि सुमिता पाटील यांचा सहभाग होता. सर्व संशोधकांचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी अभिनंदन केले.

लोकमत

# ऊर्जा साठवणुकीच्या हायड्रोथर्मल पद्धतीसाठी 'डीवायपी'ला पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च' विभागातील संशोधकांनी ऊर्जा साठविण्यासाठी संशोधित केलेल्या 'हायड्रोथर्मल' या रासायनिक पद्धतीसाठी पेटंट जाहीर झाले आहे. विद्यापीठाचे संशोधन संचालक प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे व सहयोगी प्राध्यापक डॉ. उमाकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन करण्यात आले आहे.

ऊर्जा साठवण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या मँगनीज फॉस्फेट आधारित पातळ फिती (थिन फिल्म्स) तयार करण्याच्या सोप्या, कमी खर्चिक 'हायड्रोथर्मल' रासायनिक पद्धतीसाठी हे पेटंट जाहीर झाले आहे. संशोधनामध्ये संशोधक विद्यार्थी कुलदीप गुंडूराव बेलेकर, रणजित पांडुरंग निकम, सुमिता सूर्यकांत पाटील यांचा सहभाग होता.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारीबीबीए, एमबीए, इंटेग्रेटेड प्रोग्रॅम, बीटेक अशा ४ अभ्यासक्रमाची ८ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. १ हजार ५१ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ५२४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.